९ - ९३

# महाराष्ट्र

दुरध्वनी क्रमांक. २२७९ ३१०१
फॅक्स क्र:२२८४६९७४
Emailadd:jalseven@rediffmail.com
jalseven.wc@gmail.com

क्रमांक - जशिअ - २०१५/प्र.क्र.२१० / जल- ७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक - ३० एप्रिल,२०१५

प्रति,

विभागीय आयुक्त ,
अमरावती, नागपूर,नाशिक,
महाराष्ट्र राज्य,

विषय : जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सिमेंट नाला बांध कामाच्या इ-निविदा काढताना येणाऱ्या अडचणीबाबत. व सलग्न कमां-

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत साखळी सिमेंट नाला बांध कार्यक्रमाकरीता राज्यातील ३४ जिल्हयांना निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या संदर्भात प्रशासकीय मान्यता देणे, निविदा काढणे इ. कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे. साखळी नाला बांध कामाच्या संदर्भात एका कंत्राटदारास दोनपेक्षा जास्त क्लस्टरमधील कामे देण्यात येऊ नयेत, अशा सूचना दि.२२ जानेवारी,२०१५ रोजी मा.सचिव (जलसंधारण) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या आहेत. त्या संदर्भातील इतिवृत्त दि.५ फेब्रुवारी,२०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे.

२. बुलडाणा, अकोला, यवतमाळ, वाशिम, अमरावती, धुळे, नंदूरबार,जळगांव, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, व गडचिरोली या जिल्यांमध्ये पुरेसे ठेकेदार उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे एका कंत्राटदारास दोन क्लस्टरची कामे देण्याबाबतची अट शिथिल करण्याबाबतची मागणी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने वर नमूद जिल्हयांकरीता उपलब्ध ठेकेदारांची क्षमता विचारात घेऊन व ठेकेदार कामे घेऊन ती दुसऱ्या ठेकेदाराकडे सुपूर्त करणार नाहीत याची खात्री करुन एक अपवाद म्हणुन एका कंत्राटदारास दोनपेक्षा जास्त क्लस्टरमधील कामे देण्यात येऊ नयेत, ही अट शिथिल करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याने आपणास कळविण्यात येत आहे.

(वि. सि. वखारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य अभियंता, लघुसिंचन ( जलसंधारण) पुणे,
२) मुख्य अभियंता, विदर्भ संघन सिंचन विकास कार्यक्रम,नागपूर.
३) संबंधित जिल्हाधिकारी .

C:\Users\Usha.Parab\Desktop\असकराड-डिक्टेशन-३०४१५.docx